**<u>ठळक बातम्या</u>**

- ‘भारत-इटली संयुक्त धोरणात्मक कृती आराखडा २०२५-२९’ मधे व्यावहारिक आणि भविष्यवेधी चौकट निश्चित केल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- महाराष्ट्र अणुऊर्जा क्षेत्रातल्या परिवर्तनाचं नेतृत्व करायला तयार असून राज्यात गुंतवणूक करण्याचं मुख्यमंत्र्यांचं अमेरिकी कंपन्यांना आवाहन

- सायप्रसचे राष्ट्राध्यक्ष निकोस ख्रिस्तो दौलिदेस भारत दौऱ्यावर /मुंबईत आयोजित बिझनेस फोरममधे उद्या सहभागी होणार

- अखिल भारतीय औषध विक्रेता संघाच्या एकदिवसीय बंदला राज्यात ठिकठिकाणी प्रतिसाद

**आणि**

- जातगणना करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय रद्द करण्याची मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयानं फेटाळली

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी इटलीच्या प्रधानमंत्री जॉर्जिया मेलोनी यांच्याशी आज रोम इथं शिष्टमंडळ स्तरावर चर्चा केली. विविध क्षेत्रात भारत आणि इटली यांच्यातले संबंध अधिक बळकट करण्याविषयी यावेळी चर्चा झाली. व्यापार, तंत्रज्ञान, गुंतवणूक, संरक्षण, स्वच्छ ऊर्जा आणि धोरणात्मक भागीदारी हे मुद्दे या बैठकीच्या केंद्रस्थानी होते. यावेळी दोन्ही नेत्यांनी विविध प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवरही चर्चा केली.

चर्चेनंतर दोन्ही नेत्यांनी संयुक्त वार्ताहर परिषदेला संबोधित केलं. भारत आणि इटलीनं आपले द्विपक्षीय संबंध विशेष धोरणात्मक भागीदारीत रुपांतरित करण्याचा निर्णय घेतल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी यावेळी जाहीर केलं. भारत

आणि इटली संयुक्त धोरणात्मक कृती आराखडा २०२५-२९ मधे व्यावहारिक आणि भविष्यवेधी चौकट निश्चित केली आहे, दोन्ही देशातलं सहकार्य वाढीस लागावं यासाठी यावेळी सखोल चर्चा झाल्याचं प्रधानमंत्री म्हणाले.

इटली डिझाईन आणि काटेकोरपणासाठी ओळखलं जातं तर भारत क्षमता आणि नवोन्मेषासाठी ओळखला जातो, त्यामुळे दोन्ही देशांचं सामर्थ्य एकवटून संपूर्ण मानवजातीसाठी काम करू, असा विश्वास प्रधानमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला.

**होल्ड बाईट मोदी**

**<><><><><>**

महाराष्ट्र अणुऊर्जा क्षेत्रातल्या परिवर्तनाचं नेतृत्व करायला तयार असून अमेरिकन कंपन्यांनी महाराष्ट्रात गुंतवणूक करावी, असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी केलं. ते आज यूएस न्यूक्लिअर एक्झिक्यूटिव्ह मिशन इन इंडिया अंतर्गत आयोजित अणुऊर्जा आणि अमेरिका-भारत धोरणात्मक भागिदारी परिषदेत बोलत होते.

भारत आणि अमेरिका यांच्यातले संबंध आता तंत्रज्ञान, संरक्षण, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि पुरवठा साखळी या क्षेत्रांत अधिक मजबूत होत आहेत. नागरी अणुऊर्जा सहकार्य हे या भागीदारीच्या पुढच्या टप्प्यातलं निर्णायक क्षेत्र ठरू शकतं, असंही ते म्हणाले. यावेळी अमेरिकेतल्या न्यूक्लिअर एनर्जी इन्स्टिट्यूटच्या अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी मारिया ग्रेस कोर्सनिक उपस्थित होत्या.

**<><><><><>**

अमेरिकेतले उद्योग राज्यातल्या अणुऊर्जा निर्मिती क्षेत्रात गुंतवणूक करण्याच्या मानसिकतेत आहेत असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी सांगितलं. खासगी कंपन्यांच्या सामाजिक जबाबदारी उपक्रमांमधून विविध लोककल्याणकारी योजना राबवण्यासाठी मुंबईत आयोजित टेक महाइंपॅक्ट या परिषदेच्या उद्घाटन सोहळ्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. ते म्हणाले....

**- -- होल्ड- बाईट देवेंद्र फडनवीस ---**

उर्जेची गरज भागवण्यासाठी अणुऊर्जा आणि इतर पर्यायी स्त्रोतांचा वापर गरजेचा असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

सायप्रसचे राष्ट्राध्यक्ष निकोस ख्रिस्तोदौलिदेस आजपासून भारत दौऱ्यावर आहेत. आज संध्याकाळी त्यांचं मुंबईच्या छत्रपती शिवाजीमहाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर आगमन झालं. राज्यपाल जिष्णुदेव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी त्यांचं स्वागत केलं. ख्रिस्तोदौलिदेस या दौऱ्यात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी तसंच परराष्ट्रव्यवहारमंत्री डॉ. एस जयशंकर यांची भेट घेतील. व्यापार, गुंतवणूक, संरक्षण, कृत्रिम बुद्धिमत्ता, तंत्रज्ञान अशा विविध क्षेत्रात सहकार्य बळकट करण्याबाबत दोन्ही देशात चर्चा होईल. मुंबईत आयोजित बिझनेस फोरममधे उद्या ते सहभागी होतील.

**<><><><><>**

ग्रामीण भागात रोजगाराची हमी देणाऱ्या नवीन विकसित भारत जीरामजी योजनेची अंमलबजावणी येत्या१ जुलैपासून करण्यात येणार आहे. केंद्रीय ग्रामविकास मंत्रालयाने आज संसदीय समितीसमोर त्याबाबतचं सादरीकरण केलं. देशातल्या २५ राज्यांनी या कार्यक्रमासाठीची तरतूद आधीच केली असल्याची माहिती त्यात दिली.

**<><><><><>**

अखिल भारतीय औषध विक्रेता संघानं विविध मागण्यांसाठी आज एकदिवसीय देशव्यापी संप पुकारला आहे. ऑनलाईन औषध विक्री बंद करणं, कॉर्पोरेट्सद्वारे अव्यावसायिक सवलत देणं बंद करणं, आणि बनावट औषध विक्रीला आळा घालणं, अशा औषध विक्रेत्यांच्या मागण्या आहेत. औषध विक्रीबाबत कठोर

नियमावली आणि पारदर्शकता आवश्यक असून, यासाठी केंद्र सरकारने कायदे करावे, अशी मागणीही संघटनेनं केली आहे.

**नागपूर** इथं जिल्हा केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनने संविधान चौकात निदर्शनं केली, तर **ठाण्यात**ल्या ८०० औषध विक्रेत्यांनी दुकानं बंद ठेवून निषेध नोंदवला.

**सांगली** आणि **बीड**मधे जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला.

**संपाच्या** पार्श्वभूमीवर रुग्णांची गैरसोय होऊ नये, यासाठी औषध आणि अन्न प्रशासनाने आवश्यक उपाययोजना केल्या असून, सर्व यंत्रणा सज्ज ठेवल्या आहेत. नागरीकांनी बंदच्या काळात अत्यावश्यक औषधांसाठी अन्न आणि औषध प्रशासनाच्या नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा, असं आवाहन प्रशासनानं केलं आहे.

**<><><><><>**

आगामी जनगणनेदरम्यान जातगणना करण्याचा केंद्रसरकारचा निर्णय रद्द करण्याची मागणी करणारी याचिका आज सर्वोच्च न्यायालयानं फेटाळली. सरकारला कल्याणकारी योजना राबवण्यासाठी मागासवर्गीय लोकसंख्या नेमकी माहीत असणं गरजेचं आहे**,** असं मत प्रदर्शित करत सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या नेतृत्वाखालील पीठानं सरकारच्या धोरणात्मक निर्णयात हस्तक्षेप करायला नकार दिला.

**<><><><><>**

भारत ही जगातली सर्वात वेगानं वाढणारी अर्थव्यवस्था असून इराण युद्धासारखी अनिश्चित परिस्थिती असूनही यंदा ६ पूर्णांक ४ दशांश टक्के विकासदर राखू शकेल, असा अंदाज संयुक्त राष्ट्रांचे वरिष्ठ अर्थतज्ञ इंगो पिट्टरले यांनी वर्तवला आहे. जगाची आर्थिक स्थिती आणि प्रगती अहवाल याविषयी ते बातमीदारांशी बोलत होते.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज कोलकाता नाईट रायडर्स आणि मुंबई इंडियन्स यांच्यात सामना होणार आहे. कोलकात्याच्या इडन गार्डन्स मैदानावर थोड्याच वेळात, साडेसात वाजता हा सामना सुरु होईल.

कोलकाता नाईट रायडर्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

**<><><><><>**

माजी केंद्रीय मंत्री आणि उत्तराखंडचे माजी मुख्यमंत्री भुवनचंद्र खांडुरी यांच्या पार्थिवावर आज हरिद्वार इथं शासकीय इतमामात अंतिम संस्कार करण्यात आले.

उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांनी आज खांडुरी यांच्या पार्थिवाचं दर्शन घेऊन आदरांजली वाहिली.

**<><><><><>**

गेल्या २४ तासात कोकण आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडला. राज्यात सर्वात जास्त कमाल तापमान अमरावती इथं ४६ पूर्णांक ८ दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं.

येत्या दोन दिवसात कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. विदर्भात तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे.

**//<><><><><>//**